प्रजावाणी दि. 03/03/2025

क्राईम ● कंधार पोलीस स्थानकात आरोपींवर गुन्हा दाखल

# बेकायदेशीररीत्या गायी घेऊन जाणाऱ्या वाहनावर कारवाई

वार्ताहर ● कंधार

दि. २ मार्च रोजी तीन गाई व एक गाईचे वासरू पिकअप वाहणात डांबून घेवून जाणाऱ्या दोघांजनावर कंधार पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई कंधार पोलिसांनी दि. १ मार्च रोजी सकाळी कंधार ते जळकोट जाणाऱ्या रस्त्यावर फुलवळ जवळील केली. त्यांच्याकडून ९७ हजार रुपये किमतीच्या तीन गाई, एक वासरू आणि २ लाख ८० हजार रुपये किमतीचे पिकअप जुने वाहन असा एकूण ३ लाख ७७ हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आले. मिळालेल्या माहितीवरून कंधार पोलिसांनी दि. १ मार्च रोजी सकाळी ही कारवाई केली.

## कमी जागेत दाटीवाटीने केली जात होती गोवंशाची वाहतूक



### लातूर व परभणी जिल्ह्यातील दोघे जेरबंद

कंधार ते जळकोट रस्त्यावर फुलवळ येथील महादेव मंदीराजवळ हानीफ मदार कुरेशी व्यवसाय ड्रायव्हर रा. गुडसुर ता. उदगीर जि. लातुर, महेबुब मोईन कुरेशी व्यवसाय मजुरी रा.राणी सावरगाव ता.गंगाखेड जि.परभणी या दोघांनी संगनमत करुन वेगवेगळ्या वर्णनाचे तिन कारवडी व एक लहान गाईचे वासरु असे संशयीत जनावरे एम.एच. २४ ए.यू. ४३८६ या क्रमांकाच्या लहान पिकपमध्ये कमी जागेत दाटी वाटीने वाहणात कोंबुन गाईना त्रास होईल असे निर्दयतेने क्रुरतेने दोरीने आवळून बांधून दोर टॉपला बांधून बेकायदेशीररित्या हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात वाहतुक करुन घेऊन जात असताना मिळून आले.

कंधार ठाण्यातील पो. हे. आनंदा शंकरराव नरंगले यांच्या फिर्यादीवरून हानीफ मदार खुरेशी व महेबुब मोईन खुरेशी या दोघांविरोधात प्राण्यांना कुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० व मोटार वाहन कायदा १९८९ कलम ६६/१९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.